# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक ११ वा
२१ ऑक्टोबर १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रू. ३०
किंमत १ रूपया २५ पैसे


# प्रशिक्षणाचा खरा अर्थ

## — शरद जोशी

शाळेत आपण गेलो की कुणीतरी शिक्षण आपल्या समोर येतो. पुस्तकांत काहीतरी लिहिलेलं असतं, एकामागून एक धडे शिक्षक शिकवत राहातात आणि परीक्षेला यातलं काही तरी उत्तर द्यायला लागेल हे समोर ठेवून ती उत्तरे कशी द्यावी याची तयारी व्हावी या दृष्टीने थोडीशी पोपटपंची करायला आपण शिकतो. काही ठराविक प्रकारच्या प्रश्नांना ठराविक प्रकाराची उत्तरे दिली म्हणजे परीक्षेत आपण पास होऊन जाऊ, मग नंतर त्या विषयाचा आपला काही संबंध राहिला नाही तरी चालेल; एकदाचा शिक्का मिळाला की आपण कर्तव्यातून मोकळे झालो अशा कल्पनेतून आपण शाळा कॉलेजातून जात असतो.

कृषि अर्थ प्रबोधिनीतील या प्रशिक्षण वर्गाची कल्पना थोडी वेगळी आहे. कशी वेगळी आहे हे समजून घेण्याकरिता शेतकरी संघटनेच्या गेल्या दहा वर्षातील यशाचं, अपयशं पुष्कळ आहेत पण त्यातलं जे यश आहे त्याचं कारण काय हे समजावून घेतलं तर या प्रशिक्षण वर्गाची आणि वर्गातील कामाच्या पद्धतीची सहज कल्पना येईल. शेतकरी संघटनेची आंदोलनं काही पुढे गेली, काही मागे घेतली गेली. कांद्याला भाव वाढवून मिळाला, उसाला मिळाला, दुधाला मिळाला, कपाशीला मिळाला. रक्कम काढायला गेलो तर खूप मोठी रक्कम होईल. अगदी कर्जमुक्तीच्या वेळचा आकडा घेतला तर हिंदुस्थानामध्ये चार हजार कोटी रुपयांची कर्जमुक्ती ही शेतकरी संघटनेच्या आंदोलनातून निघाली याबद्दल कुणाला शंका नाही. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाने शेतकऱ्यांचा रुपयापैशांत किती फायदा झाला असे विचारले तर हजारो कोटी रुपयांचा फायदा झाला हेच त्याचे उत्तर येईल. पण माझ्या दृष्टीने तो फारसा महत्त्वाचा नाही.

शेतकरी संघटनेने घडवून आणलेली सगळ्यात अद्भूत गोष्ट कोणती? दहा वर्षापूर्वी शेतकऱ्याला सूट नको, सबसिडी नको, भीक नको, लाचारी नको फक्त त्याच्या घामाचे दाम पाहिजे असा शेतीमालाच्या भावाचा प्रश्न शेतकरी संघटनेने मांडला. त्यावेळी सगळे पुढारी, सगळे नेते, सगळे अर्थशास्त्री कुचेष्टा करत होते, हसत होते. "शेतीमालाच्या भावाचा एककलमी कार्यक्रम" हा चेष्टेचा विषय झाला होता. "हे वैद्यबुवा प्रत्येक रोगावर जुलाबाचं औषध देऊन राहिलेत." अशी या विचाराची अवहेलनाही झाली. आज दहा वर्षानंतर या विचाराला राजमान्यता मिळाली एवढंच नव्हे, विद्वन्मान्यता मिळाली एवढंच नव्हे तर सर्व देशभर शेतकरीमान्यता मिळाली. सर्वसामान्य लोकांची या विचाराला मान्यता मिळाली. एखाद्या शेतकऱ्याला कुणी पुढारी भेटला आणि म्हणाला की तुझ्या मुलाला मी नोकरी लावून देतो तर तो शेतकरी अजूनही त्या पुढाऱ्याच्या मागे धावेल, नाही असं नाही. पण शेतकऱ्याच्या मनामधे कुठं तरी एक मोठा बदल घडून आला आहे. आज पुढाऱ्याच्या मागे धावताना त्याच्या मनात येत राहील की हे बाकीचं काही खरं नाही; जोपर्यंत आपली शेती तोट्याची आहे तोपर्यंत काही जमायचं नाही; शेती फायद्याची झाली तर कोणताही प्रश्न उरणार नाही. हा फरक कशाने पडला?

दहा वर्षांमध्ये देशभरचा म्हणा किंवा महाराष्ट्रभरचा म्हणा, एक मोठा प्रशिक्षणवर्ग शेतकरी संघटनेने चालविला. आंदोलनं जी झाली त्या आंदोलनांचा हेतू हाच होता. वर्गात बसून नुसतं शिकवलं तर या कानातनं येऊन त्या कानातनं निघून जातं. पण त्याबरोबरच काही प्रात्यक्षिक असलं, प्रयोग असला म्हणजे तो धडा नीट ठसतो. चाकणच्या कांद्याच्या आंदोलनाने शेतकऱ्यांवरील अन्यायाचं एक उदाहरण शेतकऱ्यांच्या समोर आलं. त्या आंदोलनाचा काहीएक परिणाम झाला. कपाशीच्या, शेवटच्या आंदोलनाच्या निमित्तानं ठसलं की गेल्या वर्षीची मिळत असलेली कपाशीची किंमतसुद्धा यंदा मिळत नाही म्हणजे काय? शेतकऱ्यांना अन्यायाची जाणीव झाली. आणि शासन हे काही मायबाप नाही, जिथं शक्य असेल तिथं शेतकऱ्यांच्या माना कापायला कमी करत नाही आणि त्याविरुद्ध शेतकरी उभा राहू शकतो असं कापूस आंदोलनानं शेतकऱ्यांना शिकवलं. असं एक सगळ्या महाराष्ट्रभर चाललेलं प्रशिक्षणवर्गाचा एक मोठं, दहा वर्षांचं सत्र.

पण आपल्या हातामध्ये तशी साधनं काही नव्हती. पुस्तकंसुद्धा, आपल्या काही सहकाऱ्यांनी आग्रह धरला म्हणून एवढी तरी बाहेर आली. साप्ताहिकपाक्षिक चाललं पण तेही काही नियमानं चाललं असं नाही. काही काळ साप्ताहिक 'वारकरी' चालला, मग त्यानंतर पाक्षिक 'शेतकरी संघटक' चालू झाला, पुढे काही काळ साप्ताहिक 'ग्यानबा' चालला आता पुन्हा 'शेतकरी संघटक.' पण या साहित्यामुळेच काही

***६ ऑगस्ट १९९५ रोजी श्री. शरद जोशींनी प्रशिक्षण शिबिरात केलेल्या भाषणावरून. पूर्वप्रकाशन : २१ ऑगस्ट ९०***

बदल घडून आला किंवा हा संदेश शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला असं म्हणणं कठीण आहे. मग हा प्रचार घडला कसा?

एका बाजूला काँग्रेस (आय्) ची सत्ता, काँग्रेस (आय्) नं सगळ्या शेतकऱ्यांमध्ये सहकारी संस्थांचं जाळं विणलेलं. प्रत्येक जिल्ह्यामध्ये, प्रत्येक तालुक्यात एखादा सहकारमहर्षि, सहकारश्रेष्ठी. कुणी काका, कुणी अण्णा, कुणी तात्या, कुणी मामा. हे सर्व साहेब शेतकऱ्यांना अगदी पंजामध्ये पकडून बसलेले. आणि तरीदेखील एवढ्या ताकदीच्या विरुद्ध जाऊन शेतकरी संघटना हा विचारातला बदल कसा काय घडवून आणू शकली? खरं तर हा चमत्कारच वाटावा. पण याचं उत्तर देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. पण हे उत्तर खरं आणि शेवटचं आहे असं मलाही वाटत नाही.

मला असं वाटतं की शेतकरी संघटनेने लोकांसमोर जाऊन त्याच्यापुढे एक आरसा ठेवला. जो काही विचार सांगितला तो ऐकल्यानंतर प्रत्येक शेतकऱ्याच्या मनामध्ये असं काहीतरी वाटायला लागलं की अरे आता कुठे काहीतरी जमलं, इतके दिवस जे काही विस्कळीत चित्र वाटत होतं ते या आरशात पाहिल्यानंतर त्याचे तुकडे एकमेकांना जमतात. सगळ्या प्रश्नांची उत्तरं इथं मिळतात असं त्या शेतकऱ्यांना प्रामाणिकपणानं वाटायला लागलं म्हणून शेतकरी संघटनेचा विचार पसरला. प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये जन्मल्यापासून किंवा समजायला लागल्यापासून एक अनुभवाचं मोठं गाठोडं तयार झालेलं असतं. पण ते वेगवेगळे अनुभव वेगवेगळे तुकडे असल्यासारखे आहेत. आजच्या अर्थव्यवस्थेत आणि शिक्षणपद्धतीत या तुकड्यांना एकत्र करील असा विचार नाही. या शिबिरातील एका कार्यकर्त्याने शेतकरी म्हणून अनुभव घेतला, उसाच्या शेतीचा. त्याच्यानंतर व्यापारी म्हणून अनुभव घेतला. उसाला भाव मिळाला नाही आणि व्यापारी झाल्यानंतर तिथेसुद्धा थकबाकी वाढतच राहिली. कारण आजूबाजूचे काय कापूस, ऊस पिकविणारे शेतकरी असतील त्यांचीसुद्धा थकबाकी देण्याची पात्रता नाही किंवा ताकद नाही. असे सगळे वेगवेगळ्या अनुभवांचे तुकडे एकत्र असलेले गाठोडे घेऊन प्रत्येकजण चाललेला. त्या सगळ्यांचा अर्थ लावण्याची ताकद काही आपल्यात फारशी नसते किंवा अर्थाच्या बाबतीत दिशाभूल झालेली असते. शेतकरी संघटनेने आपला विचार सांगितला आणि ऐकता ऐकता शेतकऱ्यांच्या मनात यायला लागलं की अरे, हे खरं आहे, कारण माझा अनुभव असा आहे, माझी जी प्रचिती होती त्या प्रचितीचा सिद्धांत फक्त कळतो आहे, शब्द संघटनेचे आहेत पण अनुभव माझा आहे. ही जाणीव जेव्हा सगळ्या शेतकऱ्यांमध्ये झाली तेव्हा ते महाराष्ट्रभर चालवलेलं एक खुलं विद्यापीठ, खुल्या आकाशाखालचं विद्यापीठच होतं. हजारो सभा झाल्या पण ते एका अर्थाने शिक्षणक्रमच होते.

अनुभवांच्या अनाकलनीय तुकड्यांच्या गाठोड्याला जाणीवेने एकसंध चित्राच्या स्वरूपात पाहाण्याइतपत बदल महाराष्ट्रामध्ये घडून आला. पण सगळ्या सभांमध्ये काय, कितपत सांगितलं जातं? कोणत्याही एका गावी काही ठराविक वेळ दिला जात नाही. इतरही बंधनं असतात. स्थानिक कार्यकर्त्यांनाही वाटतं की इतकी सभा जमली आहे तर आपणही थोडं बोलावं. मग जो काही सभेचा तासदीडतास वेळ असेल त्यातील अर्धा-पाऊण तास मला किंवा सभेसाठी गेलेल्या प्रमुख कार्यकर्त्यास मिळतो. मग सर्वसाधारण लोकांना ज्यात स्वारस्य आहे, अगदी नव्याने शेतकरी संघटनेशी ओळख करून घेत आहे अशा शेतकऱ्यांनासुद्धा समजतील असेच विषय फक्त त्या सभेत घेता येतात. बहुतेक लोकांच्या गाठोड्यांतील अनुभवांच्या तुकड्यांची संगती लागते एकमेकांशी. पण तुमच्यासारख्या काही लोकांच्या बहुतेक तुकड्यांची संगती लागली तरी काही तुकडे तसेच राहून जातात. बाकी सर्व समजलं भाषणातून पण अमुक अमुक गोष्टीचा यातून खुलासा होत नाही; शिल्लक राहिलेले हे प्रश्न कसे सोडवायचे?

हे सोडवण्याकरिता, खरं म्हणजे, कृषि अर्थ प्रबोधिनीतील या प्रशिक्षणवर्गाची योजना आहे. इथं काही शिकायचं आहे आणि मग इथून जाऊन, इथं डोक्यावर घेतलेलं ज्ञानाचं गाठोडं तिथं जाऊन शेतकऱ्यांच्या डोक्यावर जाऊन ओतायचं आहे असा काही प्रकार नाही. किंबहुना, इथून तुम्ही गेल्यानंतर शेतकरी संघटनेच्या प्रचाराचं काम केलंच पाहिजे असासुद्धा मुळीच आग्रह नाही. पण माझी खात्री आहे की जो मनुष्य इथं मन उघडं ठेवून नीटपणे विचार व विचारपद्धती समजावून घेईल त्याला असा काही एक भुंगा इथं लागणार आहे की तो घरी गेल्यानंतर त्याला स्वस्थ बसूच देणार नाही. एखादी गोष्ट पटली नाही तर पटली नाही असे स्पष्टपणे सांगायला काही हरकत नाही. पण निदान तो विचार समजून घेतांना जे जे काही सांगितलं जात आहे त्याचा आपल्या अनुभवाशी काही संबंध आहे का एवढं फक्त प्रामाणिकपणे तपासून घ्यायचं आहे.

आणि ही लहानसहान नव्हे, फार मोठी गोष्टी आहे. मी विद्यार्थ्यांना एक पत्र* लिहिलं आहे. "शेतकरी विद्यार्थी संघटना काढायची म्हणजे कुठं जाऊन मिरवणुका काढायची गरज नाही, कुठे जाऊन दगड फेकायची गरज नाही. तुम्ही आंदोलनात ओढलं तर उद्याचं बियाणं मी आजच खाण्याकरिता वापरून टाकलं असं होईल. तुम्ही शेतकऱ्याची मुलं आहात. उद्या शेतकरी समाजाचं नेतृत्व करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. तुमच्या या काळामध्ये तुम्ही विद्याच करणं आवश्यक आहे. पण ही विद्या करतांना, जी करता ती विद्याच आहे किंवा नाही हे तपासून पाहा. नाहीतर अविद्या ही तुम्हाला विद्या म्हणून शिकविली जाईल. आणि एका अर्थाने तुम्ही हनुमानासारखे आहात. 'भूमिकन्या' सीतेच्या शोधात रावणाच्या लंकेत आला आहात आणि रावणाचं सगळं एवढं मोठं वैभव, सोन्याची लंका, रामाकडे काय असणार – फाटकी वल्कलं नेसून जंगलात कंदमुळं खाणारा तो. तुम्हाला आईबापांनी खेडेगावातनं शहरात पाठवलं, या झगमगत्या, सगळे ऐश्वर्य असलेल्या जगामध्ये पाठवलं. आणि जर का तुम्ही रावणाच्या या सोन्याच्या लंकेच्या मोहात पडलात तर सीतेला तुम्ही तसंच सोडून रावणाच्या दरबारात दाखल होण्याची शक्यता आहे. आणि मग रामायण कधी घडायचंच नाही. कदाचित, तुम्हाला रावणाच्या दरबारात, जेव्हा पुढे कधी राम येईल तोपर्यंत सुखाची नोकरी मिळेल. पण तेवढ्या काळात सीतेची काही मुक्ती होणे शक्य नाही."

मग काय विचार करा म्हणून मी विद्यार्थ्यांना सांगितलं? "ही जी माणसं

* महाविद्यालयातील विद्यार्थ्यांस पत्र : प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश भाग २. पृष्ठ ११४-१२०

आजुबाजुला तुला दिसतात, चांगल्यापैकी घरात राहातात, घरात दिवे आहेत, खिडक्यांना पडदे लावलेले आहेत, आईबाप-मुलं एकमेकांशी बोलतात, खेळतात, फिरायला जातात. ते काही फार श्रीमंत आहेत असं नाही, पण कुटुंब म्हणून जे काही आयुष्य असतं ते ते जगतात. तुम्ही निदान स्वतःला असा तर प्रश्न विचाराल की, 'माझ्या आईबापांनी असं कोणतं पाप केलं आहे की त्यांना असं कधी जगता आलं नाही, एक दिवससुद्धा?' हा प्रश्न जर तुम्ही विचारला नाही स्वतःला, तर तुम्ही विद्यार्थी नाही. आणि या प्रश्नाचं उत्तर जर तुम्हाला दिलं गेलं नाही तर तुम्हाला शाळेत किंवा कॉलेजात शिकविली जाणारी विद्या ही मुळी विद्याच नाही."

ज्याने आसपासच्या परिस्थितीचा अर्थ लागत नाही ती विद्या कसली? इथं तुम्ही जे आला आहात तेसुद्धा काही पुस्तकं, काही वाक्यं पाठ करण्याकरिता नाही. एखाद्या भुकेलेल्याला जर दयाबुद्धीने काही पैसे दिले तर तो कदाचित् त्या दिवसाची भाकरी खाईल, पण त्याला जर का कुऱ्हाड दिली तर तो कामाला लागेल आणि रोज भाकरी खाईल अशी गोष्ट आमच्या लहानपणी सांगितली जाई. इथे तुम्हाला, शेतकऱ्यांच्या पुढे जाऊन मांडण्याकरिता अशी काही तयार गाठोडी, तयार शिदोरी दिली जाणार नाही. विचार कसा करावा इथपासून तुमच्या मनाची खात्री पटवून घेणं हा खरं तर इथल्या प्रशिक्षणवर्गाचा हेतू आहे. आणि एकदा हे विचाराचं हत्यार तुम्हाला गवसलं की मग आपापल्या गावी गेल्यानंतर, आपल्या तालुक्यात, जिल्ह्यात गेल्यानंतर नवीन काही प्रश्न निर्माण झाला तर "आम्हाला काही याचं उत्तर शिबिरात सांगितलं नव्हतं" असं म्हणायची वेळ येणार नाही. पाठांतरावर भिस्त असणारा एखादा ढ विद्यार्थी कसं म्हणतो? परीक्षेचा पेपर फुटला आहे, हा प्रश्न हमखास येणार असं मला समजलं आहे पण याचं उत्तर काय द्यायचं ते आपल्याला मास्तरांनी सांगितलेलं नाही. पण जो अभ्यासू असतो तो म्हणतो गुरुजींनी हाच प्रश्न नेमका नाही सांगितला. पण त्या अमुक एका प्रश्नाच्या उत्तरात जी रीत गुरुजींनी सांगितली ती या प्रश्नाच्या परिस्थितीत वापरली म्हणजे उत्तर येतं.

या स्वरूपाचं, एक फार आनंद देणारं उदाहरण घडल्याचं मला आठवतं. १९८४ सालच्या महाराष्ट्र प्रचारयात्रेतील घटना आहे. यवतमाळ जिल्ह्यात एका गावी प्रचारयात्रा थांबली होती. काहीतरी कुरमुरे वगैरे वाटण्याचं काम चालू होतं. दोन कार्यकर्ते एकमेकांत चर्चा करत होते. विषय होता, नुकतेच बिहारमध्ये एका हरिजन शेतमजूर बाईवर झालेल्या बलात्काराच्या घटनेचा. एक कार्यकर्ता म्हणत होता, "तिथे शेतकऱ्याने त्या बाईवर बलात्कार केला. मग तुम्ही कसं म्हणता की शेतकरी विरुद्ध शेतमजूर असा संघर्ष नाही?" त्यावर दुसऱ्या कार्यकर्त्याने अत्यंत शांतपणे सांगितलं की, "त्या हरिजन शेतमजूर स्त्रीवर बलात्कार झाला याचं एकमेव कारण आहे की शेतीमालाल रास्त भाव मिळत नाही." त्याने जो काही तर्क मांडला, जो काही निष्कर्ष काढला तो तर आहेच पण हे सारं त्यानं ज्या आत्मविश्वासानं सांगितलं हे पाहाता त्यामागे एक मोठा अर्थ आहे की, सगळ्या समाजातल्या सगळ्या छेदाछेदांचं कारण काय? सगळ्या समाजाला जी काही साचलेल्या डबक्याची अवस्था प्राप्त झाली आहे त्या डबक्यातले किडे एकमेकांशी जी काही मारामारी करताहेत त्यामागचं जे काही तात्पुरतं कारण आहे त्याचं काय महत्त्व आहे? मुळामध्ये डबकं झालंय मग त्यातले किडे किड्यासारखेच वागायला लागतात. हे त्यानं मोठ्या आत्मविश्वासानं सांगितलं.

अपेक्षा अशी आहे की इथून जातांना तुम्ही हातामध्ये एखादं नवीन हत्यार घेऊन जाल आणि हे हत्यार माझ्याकडे आहे – विचाराचे तोपर्यंत कोणीही समोर येवो – तो स्थानिक कॉलेजमधला मान्यवर अर्थशास्त्रज्ञ असो का एखादा पुढारी असो, कारखान्याचा अध्यक्ष असो का सोसायटीचा कुणी असो त्याचा सामना मी करू शकतो हा आत्मविश्वास कमवून जाल. माझ्या हातातलं हत्यार हे जगातल्या सर्व ताकदीपेक्षा श्रेष्ठ आहे असा तुम्हाला अभिमान वाटेल. एक भला मोठा पहेलवान व दुसरा ताकदीने अगदी किरकोळ मनुष्य आहे. पण त्या किरकोळ माणसाच्या हातात जर हत्यार असलं तर तो भल्यामोठ्या पहिलवानाचासुद्धा सामना करू शकतो. त्याचप्रमाणे तुम्ही इथून घेऊन जावं अशी अपेक्षा आहे त्या हत्याराच्या सहाय्याने बाकीची साधनं, संपन्नता असलेली माणसं तुमच्यापुढे फिकी पडावी.

हे हत्यार हस्तगत करता करताच ते चालवायचं कसं याचा सरावही इथेच करायचा आहे. मनात आलेला कोणताही प्रश्न विचारायला मागेपुढे पाहू नका. इथं काही कुणी शिकवणार नाही. जसं तुम्ही तुमच्या अनुभवाचा अर्थ लावता आहात तसंच इथले प्रशिक्षकसुद्धा काही शिकवून थांबलेले नाहीत. एक मोठा फरक लक्षात घ्या. शाळाकॉलेजमधला शिक्षक साधारणपणे आवश्यक पदव्या घेतल्या, डी.एड्., बी.एड्. झालं की, शिक्षण त्याचं साधारणपणे थांबलं. आपण ज्या विषयाचा अभ्यास करतो आहोत तो विषयच मुळी थांबणारा नाही. हा विषय सतत वाढणारा, सतत बदलणारा आहे. आकाशातल्या ताऱ्यांचा अभ्यास जसा, १५ दिवस केला, वर्षभर केला.... आणि म्हटलं की मला सगळं समजलं, तर ते काही खरं होत नाही. हजारो वर्षांनी ताऱ्यांची पुहा तीच स्थिती कधी येत असेल तर येत असेल, त्यांच्या सगळ्या हालचालींविषयी माहिती जर पाहिजे असेल तर सतत पाहाणे, सतत विचार करणे, सतत अभ्यास करणे याची आवश्यकता आहे. आणि मला असं वाटतं की १९८० साली ज्या परिस्थितीमध्ये शेतकरी संघटनेने कामाला सुरुवात केली तिच्यात आणि आजच्या परिस्थितीत म्हटलं तर काहीच अंतर नाही आणि म्हटलं तर महद्अंतर आहे. म्हटलं तर खूपच घडून गेलं आहे. आणि म्हटलं तर परिस्थिती पुष्कळशी तशीच आहे. पण काय बदललेलं आहे आणि काय बदललेलं नाही याचा जर विचार आपण केला नाही आणि ८० साली जी वाक्यं म्हणत होतो ती त्याच पद्धतीने, त्याच ठेक्यात, त्याच जोशामध्ये आणि त्याच आवेशाने म्हणत राहिलो तर सत्यनारायणाची पूजा सांगणारा ब्राह्मण आणि आपल्यात काही फरक राहाणार नाही. कारण निरर्थक बोलणारे सतत तेचतेच बोलत असतात, कितीही काळ गेला तरी. पण मी आज जे बोलतो आहे ते आजच्या परिस्थितीला लागू आहे ही जाणीव आणि हा आत्मविश्वास असला म्हणजे मग त्याला खऱ्या अर्थाने विषय समजला असे म्हणता येईल.

●

# ४. गोठ्याची लढाई

पशु-कृषि-संस्थेत काय काय घटना घडल्या याचे वृत्त उन्हाळ्याच्या अखेरीपर्यंत देशाच्या अर्ध्या-अधिक भागात सर्वत्र पसरले होते. स्नोबॉल आणि नेपोलियन कबुतरांचे थवे रोज बाहेर उडवीत असत. शेजारच्या शेतातील प्राण्यांमध्ये मिसळून त्यांना क्रांतिकथा सांगाव्यात अशा सूचना कबुतरांना देण्यात आल्या होत्या. 'देशातील पशूंनो' हे गीतही त्या प्राण्यांना शिकवावे असे त्यांना सांगण्यात आले होते. पशु-कृषि-संस्थेला लागूनच पिल्किंग्टनची शेतीवाडी होती. गैरव्यवस्था आणि निष्काळजीपणामुळे त्या शेतीवाडीला अगदी अवकळा आली होती. जिकडे तिकडे तण माजले होते, कुरणे उजाड पडली होती आणि कुंपण मोडकळीला आले होते. पिल्किंग्टनचा कल आळशीपणाकडेच होता. थोडी फार मच्छीमारी आणि शिकार करण्यात त्याचा बराच काळ जाई.

पशु-कृषि-संस्थेचा आणखी एक शेजारी होता. तो म्हणजे फ्रेडरिक. फ्रेडरिकची शेतीवाडी आटोपशीर होती आणि त्याची कसणूकही चांगल्या प्रकारे होत होती. फ्रेडरिक हा मोठा खमक्या आणि धूर्त माणूस होता, तो सदैव कसल्या ना कसल्या कोर्टकज्ज्याच्या कामात असे. व्यवहारात आपली तुंबडी कशी भरावी यासंबंधीचे त्याचे ज्ञान जबर होते. फ्रेडरिक आणि पिल्किंग्टनचा उभा दावा. कोणत्याही गोष्टींवर एकमेकांच्या हिताच्या बाबीवरसुद्धा त्यांचे कधीच एकमत होत नसे.

मात्र शेजारीच पशु-कृषी-संस्था स्थापन झाल्यापासून दोघेही घाबरून गेले होते. आपल्या शेतीवाडीतील प्राण्यांना या बंडाची माहिती मिळू नये आणि त्यांच्या कानात बंडाचे वारे शिरू नये यासाठी दोघेही अतिशय काळजी घेत होते. प्राण्यांनी स्वतःच शेतीवाडीची व्यवस्था पाहण्याच्या कल्पनेची त्यांनी पुष्कळ टर उडवली. अवघ्या पंधरा दिवसांत या 'पशु-कृषि-संस्थे'चा निकाल लागेल असे ते म्हणत. 'पशु-कृषि-संस्थे'चा हट्टाने ते 'मानव-कृषि-संस्था' असाच उल्लेख करीत. पशु-कृषि-संस्थेबद्दल खोट्या अफवादेखील ते उठवीत. 'उपासमारीने पशु-कृषि-संस्थेत भयंकर दुष्टपणाची कृत्ये चालू आहेत. प्राणी आपल्या स्वजातीयांनाच ठार मारून त्यांचे मांस भक्षण करीत आहेत. लालभडक गरम लोखंडाचे डाग देऊन एकमेकांचा अनन्वित छळ करीत आहेत. नीतिमत्ता फारशी उरलेली नसून माद्या सार्वत्रिक मालकीच्या झाल्या आहेत' अशा प्रकारच्याच बातम्या ते पसरवीत. निसर्गाच्या नियमाविरूद्ध बंड केल्यामुळे त्याची अशी फळे भोगावी लागत आहेत असे फ्रेडरिक आणि पिल्किंग्टनचे म्हणणे होते.

पशु-कृषि-संस्थेबद्दल काही चांगल्या अफवादेखील पसरलेल्या होत्या. उदाहरणार्थ, 'पशूंनी चालविलेल्या कृषी-संस्थेत खरोखरच स्वर्ग अवतरला आहे. सर्वत्र आबादीआबाद आहे'.

या बातम्यांमुळे साऱ्या खेडोपाडी, शेतीवाडींमध्ये बंडखोरीचे वातावरण निर्माण झाले होते. घोडे आजवर फार आज्ञाधारक होते, ते खवळून माणसांच्या अंगावर धावू लागले. मेंढरांनी कुंपणांची मोडतोड करून शेतातील वेलींचा चट्टामट्टा करण्याचा सपाटा लावला. गाईंनी दुधाच्या चरव्या लाथाडण्याचा क्रम आरंभिला. शिकारीसाठी वापरण्यात येणाऱ्या घोड्यांनी स्वारांना पाठीवरून उलथून टाकण्यास सुरुवात केली. 'देशातील पशूंनो' हे गीत वाऱ्याच्या वेगाने सर्व प्राण्यांच्या कानांपर्यंत पोहोचले होते.

हे गीत कानावर पडल्यावर माणसांच्या अंगाचा नुसता तिळपापड होत होता. पण आपल्याला हे सर्व हास्यास्पद वाटत आहे असा आव मात्र माणसे आणीत होती. असले भिकारडे भारूड प्राणी कसे काय म्हणू शकतात? असे ते म्हणत. एखादा प्राणी हे गीत म्हणताना सापडला तर जागच्या जागी त्याची चामडी लोळविण्यात येई. तरीही हे गीत दडपून टाकणे त्यांना सर्वस्वी अशक्य झाले.

कुंपणाजवळच्या झाडीत बसून कोकिळा मंजूळ आवाजात हे गीत गात. कबुतरे याच गीताचे सूर घुमवीत.

ऑक्टोबर महिन्यात पशु-कृषि-संस्थेतील धान्यकापणी आटोपली, मळणीचे काम सुरू झाले. तेवढ्यात एकेदिवशी कबुतरांचा थवा वेगाने झेपावत आला. प्रचंड कलकलाट करून त्यांनी धोक्याचा इशारा दिला की जोन्स आपली कृषि-संस्था परत मिळविण्यासाठी चाल करून येत आहे. त्याच्याबरोबर त्याची गडी माणसे आणि फ्रेडरिक, पिल्किंग्टनचीही माणसे आहेत.

खरोखरच जोन्स आणि त्याच्याबरोबर माणसांचा मोठा जमाव कृषि-संस्थेत प्रवेश करता झाला. त्यांच्या हातात लाठ्याकाठ्या होत्या. जोन्सच्या हातात तर बंदूकच होती.

अशा प्रकारची घटना केव्हातरी घडणार याबद्दल प्राण्यांना खात्री होती. त्यासाठी त्यांनी आधीच तयारी केलेली होती. स्नोबॉलला बंगल्यात 'ज्यूलिअस सीझरच्या लष्करी मोहिमा' हे पुस्तक सापडले होते. त्याने त्याचा काळजीपूर्वक अभ्यास केला होता. प्राणिसेनेची रचना करण्याचे आणि युद्धाचे नेतृत्व करण्याचे काम त्याच्याकडेच होते. त्याने हुकूम सोडल्याबरोबर दोन मिनिटांत प्राणीसैन्याच्या तुकड्या आपल्या नेमून दिलेल्या जागी पवित्रा घेऊन उभ्या राहिल्या.

शेतातील इमारतीच्या बाजूला माणसे येऊन पोहोचतात न पोहोचतात तोच स्नोबॉलने त्यांच्यावर पहिला हल्ला चढविला. सर्व कबुतरांनी माणसांच्या डोक्यांवर घिरट्या घालीत हवाई हल्ला केला. कुंपणाजवळच्या

## जनावरांचे शिवार

**जॉर्ज ऑरवेल यांच्या Animal Farm चे भाषांतर : श्री. रमेश मुधोळकर (१९८५)**

**पूर्वसूत्र**

**अपेक्षेपेक्षा लवकर आणि विशेष प्रयत्न करावे न लागता मिळालेल्या 'स्वराज्या'च्या नशेत सर्व प्राणी 'बुद्धिमान' डुकरांच्या नेतृत्वाखाली देहभान हरपून कामाला लागले.**

**काम करणारे वेगळे, कारभार पाहाणारे वेगळे. 'बुद्धि'चा वरचष्मा झाला. घटनेत बदल झाला. उत्पादित संपत्तीतील मोठा वाटा 'बुद्धिमानां'नी राखून ठेवला. यात काहीतरी गैर आहे हे वाटत असतानासुद्धा 'जोन्सची राजवट पुन्हा येऊ नये' म्हणून 'कारभारी डुकरांचे आरोग्य टिकविणे ही महत्त्वाची बाब आहे' याबद्दल सर्व प्राण्यांची खात्री पटविण्यात डुकरे यशस्वी झाली.**

झाडीतील बदकांनीही आपल्या चोची सरसावीत हवाई हल्ला केला. माणसांची आघाडी विस्कळीत करण्यासाठी ही छोटीशी चाल होती. माणसांनी काठ्यांनी बदकांना पळवून लावले, तेव्हा स्नोबॉलने चढाईचा दुसरा टप्पा हाती घेतला. म्युरिअल, बेंजामिन आणि बाकीच्या मेंढरांनी माणसावर चाल केली. वेगाने धावत जाऊन हुलकावण्या देत माणसाला धडक मारण्यास त्यांनी सुरूवात केली. बेंजामिन मागच्या पायांनी माणसांवर लत्ताप्रहर करू लागला. पण माणसांच्या काठ्या व त्यांचे खिळ्याचे बूट यामुळे माणसांची सरशी होऊ लागली. तेवढ्यात स्नोबॉल जोरात किंचाळला. त्याबरोबर सर्व प्राण्यांनी पाठ फिरविली. एक दरवाजा ओलांडून त्यांनी पलीकडच्या आवारात धाव घेतली. स्नोबॉलचा हा आणखी एक डावपेच होता.

शत्रूने पळ काढला असे दिसताच माणसांना त्वेष चढला. त्यांनी विजयाच्या घोषणा देण्यास सुरूवात केली. असेच घडावे अशी स्नोबॉलची योजना होती. माणसे आवाराच्या आत, हल्ल्याच्या टप्प्यात येताच तीन गाईंनी आणि इतर डुकरांनी त्यांच्यावर हल्ला केला आणि त्यांचा बाहेरच्या जगाशी संबंध तोडला.

स्नोबॉलने जोन्सवर चढाई केली. पण जोन्सजवळ बंदूक असल्याने त्याने स्नोबॉलवर गोळ्या झाडल्या. गोळ्या स्नोबॉलला चाटून गेल्या. त्याच्या अंगातून रक्त वाहू लागले. जोन्सच्या गोळ्यांनी मागचा एक मेंढा मरून पडला. स्नोबॉलने त्वेषाने जोन्सच्या पायावर मुसंडी मारली. जोन्स कोलमडून शेणात पडला. त्याची बंदूक दूर पडली.

बॉक्सरच्या जोषपूर्ण हल्ल्याचे सर्वांत चित्तथरारक दृश्य होते. त्याने एका गड्याला असा जबरदस्त फटका दिला की तो परत उठलाच नाही. हे भयंकर दृश्य पाहून माणसांच्या हातातील काठ्या गळून पडल्या. ते घाबरले. पुढच्याच क्षणी त्यांनी पळ काढला. प्राण्यांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना पळता भुई थोडी केली. शेवटी पाच मिनिटातच माणसांनी माघार घेतली. अतिशय लज्जास्पद पराभव त्यांच्या पदरी आला होता.

जमिनीवर आडव्या पडलेल्या माणसाकडे पाहून बॉक्सर दुःखाने म्हणाला,'तो मेला आहे. पण मी त्याला हेतुतः मारले नाही'.

'कॉम्रेड! भावनाप्रधान होऊ नकोस!' स्नोबॉलने त्याला समजावले, 'युद्ध म्हणजे युद्ध! तिथे दयामाया नाही. माणूस चांगला असतो तो फक्त मेल्यावरच!' 'पण कुणाचाही प्राण घ्यावा अशी माझी मुळीच इच्छा नाही. अगदी माणसाचासुद्धा!' बॉक्सरने अश्रूपूर्ण नेत्रांनी म्हटले. तेवढ्यात कुणीतरी ओरडले, 'मॉली कुठे आहे?' सर्वांना काळजी वाटू लागली. माणसांनी तिला मारून तर टाकले नाही? पळवून तर नेले नाही? असे प्रश्न सर्वांना सतावू लागले. पण शोध केल्यावर ती स्वतःच्याच तबेल्यात गवतात तोंड खुपसून लपलेली आढळली.

विजयाचा जल्लोष करीत सर्व प्राणी एकत्र जमले. आपण काय पराक्रम केला याचे वर्णन प्रत्येकजण दुसऱ्याला सांगू लागला. ताबडतोब तिथेच एक विजय समारंभ साजरा करण्यात आला. विजयध्वज उंच आकाशात फडकविला गेला आणि सर्वांनी 'देशातल्या पशूंनो' हे गीत एकसुरात अनेकवार म्हटले. युद्धात ज्या मेंढराने आत्मबलिदान केले त्याचा इतमामाने अंत्यविधी करण्यात आला. एक पवित्र वनस्पतीचे रोप त्याच्या समाधीवर लाण्यात आले. त्याच्या समाधीनजीक उभे राहून स्नोबॉलने दुखवट्याचे भाषण केले. 'जरूर पडली तर पशु-कृषि-संस्थेच्या रक्षणासाठी सर्वांनी आपला प्राण देण्याची तयारी ठेवली पाहिजे'. असे कळकळीचे आवाहन त्याने सर्वांना केले. युद्धात शौर्याने लढल्याबद्दल 'पशु नायक प्रथमश्रेणी' असा किताब स्नोबॉल आणि बॉक्सर यांना देण्यात यावा असे सर्व जनावरांनी एकमताने ठरविले. त्याचवेळी ताबडतोब हा किताब म्हणून पितळेचे एकेक पदक देऊन बॉक्सर आणि स्नोबॉलचा गौरव करण्यात आला. (सामानाच्या खोलीत सापडलेल्या घोड्याच्या अंगावर घालण्यात येणाऱ्या पितळी पदकांपैकी ही पदके होती.) 'पशु-नायक द्वितीय श्रेणी' हा किताब लढाईत बळी गेलेल्या मेंढराला मरणोत्तर प्रदान करण्यात आला.

या लढाईला काय नाव द्यावे याबद्दल बरीच चर्चा झाली. शेवटी 'गोठ्याची लढाई' असे नाव नक्की करण्यात आले. कारण इथेच धुमश्चक्री झाली होती. जोन्सची शेतात पडलेली बंदूक प्राण्यांना मिळाली होती. ही बंदूक एखाद्या तोफेसारखी ध्वजस्तंभाजवळ उभी करण्यात आली. महत्त्वाच्या प्रसंगी बंदुकीतून बार काढावेत असा निर्णय घेण्यात आला. स्वातंत्र्यदिनी आणि गोठ्याच्या लढाईच्या दिवशी दरवर्षी बंदुकीचे आवाज काढावेत असे ठरविले गेले.

●

'उद्योगधंदे काढणे किंवा व्यापारउदीम चालविणे हे सरकारचे काम नसून लोकहिताची काळजी घेणे हेच सरकारचे प्रमुख काम आहे. दुर्दैवाने, स्वातंत्र्योत्तर काळात सरकारनामक यंत्रणेने व्यापार, उद्योग, कारखानदारी हे सगळंच आपल्या ताब्यात घेतले. लोकांकडून कररूपाने मिळणारा पैसा गुंतवून 'पब्लिक सेक्टर' म्हणजे सार्वजनिक क्षेत्र म्हणून शेकडो कारखाने काढले. ते तोट्यात चालू लागले. भरमसाठ निधी फस्त करू लागले. हा निधी मिळावा म्हणून सरकार प्रजेवर नाना कर लादू लागले. देशात कोणतेही काम करायचे कुणी ठरवले तर त्याला परवाने, लायसेन्स मिळविणे आपण अनिवार्य करून टाकले. या सर्वांचा परिणाम काय झाला? लोकहित तर साधले गेले नाहीच, उलट प्रगतीचा वेग मात्र मंदावला.'

## हे कोण बोलले ?

हे उद्गार आहेत त्या उद्गारांत ज्या सरकारविषयी टीका केली आहे त्याच सरकारातील सन्माननीय वाणिज्यमंत्री पी. चिदंबरम यांचे! वाणिज्य मंत्री मराठवाडा इंडस्ट्रीज असोसिएशनच्या रौप्यमहोत्सवानिमित्त औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या समारंभात बोलत होते.

**नक्राश्रू, नक्राश्रू म्हणतात ते हेच.**

'दै. मराठवाडा'वरून

# या देशावर राज्य कुणाचे ?

**डॉ. मानवेंद्र काचोळे, औरंगाबाद**

या देशात सरकारबद्दल जनतेत आपलेपणा कधी निर्माण झाला नाही. सतत सरकार म्हणजे प्रजेचा सामूहिक शत्रु हे नाते लोकांनी पक्के मनात ठेवलेले दिसतेच. सरकारी मालमत्तेची लूट किंवा नुकसान होत असेल तर त्याबद्दल सर्वसाधारणपणे कसा विचार केला जातो हे ध्यानात घेतले तर लोकांच्या मनात सरकार ही काय चीज आहे हे स्पष्ट होते. कुणी सरकारचे खातोय त्यात आपले काही जात नाही. ज्याने सरकारी दंड बुडवला, कर बुडवला, सरकारी नियमात पळवाट काढली, सरकारला बेवकूफ बनवले त्या माणसाबद्दल सर्वसाधारणपणे कौतुकच असते. आदरही असतो. आपल्याला जे जमले नाही ते त्याने केले याचा आनंदही असतो.

यात सरकार आणि समाज यांच्या नात्याचे एक मानसशास्त्र दडलेले आहे. सरकार आपले संरक्षण करते, सरकार आपल्या भल्यासाठी असते, सरकारी माणूस आपल्याकडे येतो तो आपली अडचणीतून सुटका करण्यासाठी, असे कुणालाही वाटत नाही. सरकारी माणसे आपल्या गावात, घरात येतात. तेव्हा ही 'बला' कशी टाळायची, आता काय काय ताप होणारय, असेच कुणाच्याही मनात येते. अगदी जे लोक आपल्याकडे आपले भले करण्यासाठी म्हणून येतात त्यांच्याबद्दल काय वाटते? त्यांना सरकारकडून काहीतरी मिळत असले पाहिजे, किंवा या कामात त्यांचा स्वतःचा काहीतरी फायदा असला पाहिजे हे मनात ठेवूनच अशा लोकांबरोबर व्यवहार केला जातो. सरकारी योजना, मदत, कल्याणकारी कार्यक्रम या सगळ्यांकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहिले जाते? या लुटीच्या पर्वण्या आहेत. सरकारला लुटायच्या या नवनव्या योजना आहेत. ही मंडळी सरकारला लुटताहेत आणि आपल्याला लुटीचा हिस्सा देतायत याबद्दलही आदर, कौतुक वाटायला लागते.

याला कारणही तसेच जबरदस्त आहे. तसे पाहिले तर गेली तीन हजार वर्षे भारतात ठिकठिकाणी सरकार हे परकीय किंवा स्वकीय लुटारूंचे असेच चित्र राहिले आहे. त्याआधी काय परिस्थिती होती याबद्दल वेगळे लिहायला लागेल. पण कधी काळी सरकार आपले रक्षक आहे, अशी परिस्थिती असण्याची शक्यता आदिम अवस्थेतच असावी असा निष्कर्ष निघतो.

राजे. त्यांची राज्ये, राज्य एका राजाकडून दुसऱ्या राजाकडे जाणे, राज्याचा कब्जा घेणे या गोष्टी १९४७ पर्यंत चालत होत्या. मानवी इतिहासात दोन तीन हजार वर्षे सातत्याने प्रजेचा आणि राजाचा जो संबंध टिकून राहिला आहे, तोच समाजमानसात घट्ट होतो. सहजासहजी नष्ट व्हावी अशी ही गोष्ट नाही. त्यामुळे लौकिक अर्थाने सरकार हे परक्यांचे, आणि आपण म्हणजे प्रजा ही 'सरकार'बाहेर असणाऱ्या लोकांची धारणा दिसून येते. अशा स्थितीत सरकारला बुडवले तर त्याचे कौतुक व्हावे, सरकारी अधिकाऱ्याला बनवले तर त्याचे भूषण वाटावे अशा गोष्टी समाजात रूढ झाल्या तर त्यांचे नवल वाटू नये. पण खरोखर हीच परिस्थिती वास्तवात आहे काय? प्रत्यक्षात चांगले वाईट अनेक राजे होऊन गेले. सरकारे बदलली. तरीही सरकारबद्दलची हीच भावना समाजमनात का टिकून आहे याचाही विचार करावा लागेल. उघड दिसते ती गोष्ट अशी, गावोगाव विखुरलेली माणसे ही प्रजा. राजा कुठे तरी मोक्याच्या ठिकाणी, दुसऱ्या राजांपासून आणि प्रजेपासूनही सुरक्षित अशा ठिकाणी नगर वस्तीत. या नागरी वस्तीत बव्हंशी राजाच्या दरबारी सरकारमध्ये आपली भूमिका बजावणारी मंडळी. गावोगाव, वस्त्यावस्त्यांमधून या सरकारी मंडळींशी जवळीक असणारी, संबंध असणारी किंवा गावाच्या वतीने सरकारशी आणि सरकारच्या वतीने गावाशी व्यवहार करणारी मंडळी. राजा कोणीही असो ही मंडळी नेहमीच सत्तेची राबवणूक करणारी मंडळी राहिली आहे. गावोगाव खेड्यापाड्यातून, वस्तीवस्तीतून असलेले सत्तेचे म्होरके हाही या मंडळीचा एक विस्तारित भाग आहे. सरकार बदलले तरी सरकारी मंडळी बदलत नाही. या गटाऐवजी त्या गटाची सरकारी मंडळी सरकार दरबारी आपले वजन टिकवून असते. कधी कधी तर सरकारी मंडळी आपल्याला सोयीस्कर राजा सत्तेत यावा यासाठी प्रयत्नशील असते. बहुतेक सत्तांतरात या मंडळींचा प्रयत्न किंवा पाठिंबा दिसून येतो.

म्हणून मग नगरात, राज्यात कोणीही सत्तेवर येवो, गावात, खेड्यात सत्तेचे म्होरके बदलत नाहीत. लोकांची आणि सत्तेची नाती बदलत नाहीत. लोकांच्या मनातले सत्तेचे स्वरूप, सत्ताधाऱ्यांचे स्वरूप बदलत नाही. सत्ताधारी बदलतो एवढेच.

स्वातंत्र्यानंतर अठ्ठेचाळीस वर्षे उलटून गेली. वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या पक्षांची सरकारे आली आणि गेली. आज भारतभर प्रत्येक पक्ष कुठल्या ना कुठल्या राज्यात, शहरात, गावात सत्तास्थानी आहे. एक पक्ष झाकावा आणि दुसरा काढावा इतके साम्य या सर्व पक्षांच्या कारभारात आहे. त्वेषाने एकमेकांविरोधात ही मंडळी भांडतात. एकाला फेकून दुसरा गादीवर येतो. आपल्यालाही वाटते की देशात राजा कोण असावा हे ठरवण्याचे सामर्थ्य आपल्याकडे आहे. आपल्या मताची ही ताकद आहे. पण खरे काय आहे? राजा बदलता येतो. पण नवा राजा कसा असावा हे ठरवता येत नाही. राज्य कोणाच्या हातात द्यावे ते ठरवता येते. मात्र ते कसे चालावे हे ठरवता येत नाही. अशी विचित्र परिस्थिती लोकशाही भारतात निर्माण झाली आहे.

महाराष्ट्रात पहिल्यांदा मोठ्या अपेक्षेने लोकांनी काँग्रेस सरकार पाडून शिवसेना-भाजपला सरकार बनवण्याची संधी मिळवून दिली. लोक अपेक्षेने काय बदल होतील याकडे पाहू लागले आहेत. नव्या सरकारचे निर्णय जाहीर होताहेत. आम्ही हे करतोय, आम्ही ते करतोय, आमच्या राज्यात हे चालणार नाही, ते चालणार नाही अशा घोषणा कानावर गेल्या अठ्ठेचाळीस वर्षात भारतातील विविध राज्यात विविध रंगाच्या

पक्षांनी राज्य केले. केंद्रातही वेगवेगळ्या रंगांची सरकारे आली. पण सगळ्याच राज्यातील सरकार आणि प्रजा यांच्यातले संबंध आजसारखेच दिसतात. केंद्रात आणीबाणीनंतर जनता पक्षाचे सरकार आले. मंडळींनी बैठकी बदलल्या. वेगळ्या बैठकांचे मानकरी वेगवेगळ्या स्तरावर सत्ताधीश झाले. बहुतेक ठिकाणी सत्ताधिशांनी नव्या राजांशी जुळवून घेतले किंवा अधिकृतपणे टोप्यांचा रंग बदलला. हरयाणा राज्यात तर ठराव करून अख्ख्या विधीमंडळाचा पक्ष बदल झाला. मुख्यमंत्री तेच राहिले. मंत्री तेच राहिले. गावोगावच्या सरपंचांनी जनता दलात प्रवेश केला. सत्तेचे वाहक जुनेच राहिले. संदर्भही जुनेच. संबंधही जुनेच राहिले.

महाराष्ट्रातही तेच होत आहे. वातकुक्कुट यंत्र एखादे वेळी वाऱ्याची दिशा चुकीची दाखवील पण सरपंच, साखर कारखान्यांचे डायरेक्टर्स, सहकारी चळवळीचे म्होरके, हाउसिंग बोर्डाचे डायरेक्टर्स यांनी राज्यात सरकार बदलल्याचं अचूक दाखवून दिले. मंत्री विमानतळावर आल्यावर त्यांना भेटायला कोणकोण मंडळी जातात हे पाहिल्यावर हे सगळे लोक पूर्वीच्या सरकारच्याही जवळच होते हे ठळकपणे दिसते.

एकूण मतितार्थ काय? तर राजा बदले, ताज बदले, बदले जहाँ सारा, सत्तेचे आणि प्रजेचे संबंध बदलत नाहीत. राजा आणि प्रजेचे शत्रुत्वाचे संबंध कायम राहतात. स्वातंत्र्यानंतरही हे संबंध भारतात गेली पन्नास वर्षे कायम टिकून आहेत. वेगळ्यावेगळ्या विचारसरणीच्या सरकारांना सत्तेवर आणूनही या संबंधात फरक नाहीये. संपूर्ण जगातही हे संबंध असेच राहिले आहेत. हे संबंध बदलण्याचे प्रयत्न कम्युनिस्ट देशांनी केले. कम्युनिझम संपला पण हे संबंधं बदलले नाहीत. समाजवाद्यांनी हे प्रयत्न केले. समाजवाद संपला. संबंध तेच राहिले. हुकुमशहांनाही हे चित्र बदलता आलेले नाही. या विपरीत काही घडेल या किंवा त्या पक्षाचे सरकार या देशात येईल आणि मग सरकार आणि प्रजेचे संबंध बदलतील असे मानणे खुळेपणाचे ठरेल.

मग यावर उपाय काय? या संबंधाचे एक टोक असे आहे की प्रजेच्या प्रत्येक बाबीत सरकारने लक्ष घालावे. प्रजेला सुखी करावे. असे आजपर्यंत कुठे घडल्याचाा अनुभव नाही. या मार्गाने सर्व नियोजन करणारे गेले. नियंत्रण करणारे गेले. प्रजा सुखी झाली नाही. शेवटी प्रजेच्या प्रत्येक बाबीवर नियंत्रण करणाऱ्या, समाजवादी म्हणवणाऱ्या राज्यपद्धती कोसळल्या.

या संबंधाचे दुसरे टोक म्हणजे प्रजेच्या प्रत्येक घटकाने राजा बनणे. आपले सर्वाधिकार आपल्याकडे ठेवणे. अत्यंत आवश्यक वाटतील तेवढेच अधिकार राजाला किंवा सरकारला देणे. त्यात प्रत्येकजण स्वतःपुरता स्वतःचा राजा असेल. नियंत्रण करणारा, नियोजन करणारा दुसरा कुणी असणार नाही.

हा विचार जगभर आपले मूळ धरतोय. तंत्रज्ञानामुळे आता कुणाला दुसऱ्यावर सत्ता गाजवणे अवघड होत आहे. इतिहासात कधी हे घडले नाही. पण आता हे घडतेय. याची सुरुवात जगभर पसरलेल्या ब्रिटिश, फ्रेंच साम्राज्याचा संकोच होण्यापासून झाली. देश स्वतंत्र झाले. जपान, जर्मनी, व्हिएतनाम, अफगाणिस्तान आणि शेवटी रशिया येथील अनुभव आपल्या गाठी आहे. लोकांच्या इच्छेविरूद्ध त्यांच्यावर राज्य करता येत नाही हे ठिकठिकाणी सिद्ध झाले आहे. निरनिराळ्या ठिकाणी सरकारचे अधिकार कमी होत जाताना दिसताहेत. प्रजा आपले अधिकार स्वतःकडे घेत आहे. हा प्रवास प्रजेचे-सरकारचे संबंध बदलणारा आहे. रोज कुठे तरी या संबंधात नवे संघर्ष उभे राहताहेत. कुठलेही सरकार सहजासहजी असे अधिकार सोडत नसते. पण लोकांच्या हातून कळत नकळत असे घडतेय. न्याय-धर्म-कला ही क्षेत्रे सरकारच्या ताब्यातून सर्वात आधी सुटतात. एक निवडणूक आयुक्त सरकारच्या तावडीतून मुक्त झाला की काय होते हे आपण सगळ्यांनी पाहिलेच आहे. जितक्या प्रमाणात न्याय, धर्म, कला, शिक्षण, व्यापार, व्यवसाय, आरोग्य या क्षेत्रातून सरकारचे अधिकार कमी होतील, तितक्या प्रमाणात प्रजेच्या जीवनातले त्यात्या क्षेत्रातील सरकारचे संबंध बदलतील. सरकार मित्रांचे होईल. राजा जनतेचा मित्र होईल. किंबहुना राजा शत्रु असला तरी त्यामुळे प्रजेचे काही बिघडणार नाही.

●

# कृषि अर्थ प्रबोधिनीतील प्रशिक्षण शिबिरे

शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी कृषि अर्थ प्रबोधिनीने तयार केलेल्या नवीन अभ्यासक्रमाचे पहिले शिबीर २ ते ११ ऑक्टोबर १९९५ या दिवसांत आंबेठाण येथे यशस्वीरित्या पार पडले. या शिबिरास जिल्हा प्रमुख व प्रमुख कार्यकर्ते मिळून पंचवीस प्रशिक्षणार्थी हजर होते. अभ्यासक्रम समितीतील सदस्य डॉ. मानवेंद्र काचोळे, डॉ. श्याम अष्टेकर व श्री. अजिद नरदे यांनी श्री. शरद जोशींच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे संयोजन केले.

६ नोव्हेंबर १९९५ पासून नियमितपणे शिबिरे सुरू होत आहे. शिबिरास येऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांची नोंदणी कृषि अर्थ प्रबोधिनीत सुरू आहे. या यादीतून शिबिराच्या सहज संचालनाच्या दृष्टीने सोयीचे जावे म्हणून निवड करून शिबिरार्थींना निमंत्रण पाठविण्यात येणार आहे. प्रत्येक शिबिरात फक्त पंचवीस प्रशिक्षणार्थींचाच समावेश करणे शक्य असल्याने निमंत्रणाशिवाय कोणीही शिबिरास येऊ नये असे शिबीर संयोजक कळवितात.

●

## शिवार : सर्वसाधारण सभा

शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या शेतीमालाला व त्यापासून बनविलेल्या वस्तूंना देशांतर्गत व परकीय बाजारपेठेचा लाभ मिळवून देण्यासाठी स्थापन झालेल्या 'शिवार ॲग्रो प्रॉडक्टस्‌ लि.' या कंपनीच्या भागधारकांची पहिली सर्वसाधारण सभा दिनांक १ नोव्हेंबर १९९५ रोजी सकाळी ११ वाजता नागपूर येथे 'गुजराथी समाज सभागृहा'त आयोजित करण्यात आली आहे.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st October, 1995

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
October 21, 1995

To

**PNCW 281**
Licence to post without prepayment **No. 87**

# दीपावली शुभेच्छा !

बळीराजा,
अपार आहे
तुझी ताकद –
सहन करण्याची ।

सहन करीत राहा
'त्यां'नी केलेली लूट
सहन करीत राहा
'त्यां'नी केलेला जुलूम ।

गोऱ्ह्याचं पोरपण सांभाळतोस
पण पोराला ढोरासारखं राबव
मायच्या कुशीतल्या लेकीला
संसारात नांदव ।

बळीराजा, तुझे दिवाळे
त्यांच्या दिवाळीचा आधार
'त्यां'ची दिवाळी सुखाची
अन् समाधानाची जावो ।

**३० ऑक्टोबर**
**बळीराज्य वर्धापन दिन**
●
**१० नोव्हेंबर**
**शेतकरी हुतात्मा दिन**

## शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडी कार्यकारिणीची संयुक्त बैठक

शेतकरी संघटनेची कार्यकारिणी आणि शेतकरी महिला आघाडी यांची संयुक्त सभा बुधवार दिनांक १ नोव्हेंबर १९९५ रोजी सायंकाळी ४ वाजता, नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

या सभेत –

१. देशातील राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थिती
२. महाराष्ट्रातील, तसेच देशातील पीकपरिस्थिती
३. आर्थिक खुलीकरणाच्या सरकारी कार्यक्रमाचा आढावा.
४. प्रशिक्षण कार्यक्रम.

या विषयांवर चर्चा होऊन शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडी यांच्या पुढील वर्षातील कार्यक्रमांचा व बांधणीचा आराखडा ठरविण्यात येईल.

## *स्वराज्याची गुरुकिल्ली*

***– म. गांधी***

कानून हमें पसंद न हों तो भी उनके मुताबिक चलना चाहिये, यह सिखावन मर्दानगी के खिलाफ है, धर्म के खिलाफ है और गुलामी की हद है ।

सरकार तो कहेगी कि हम उसके सामने नंगे होकर नाचें। तो क्या हम नाचेंगे ? अगर मैं सत्याग्रही होऊं तो सरकार से कहूंगा : 'यह कानून आप अपने घर मे रखिये । मैं न तो आपके सामने नंगा होनेवाला हूं और न नाचनेवाला हूं ।' लेकिन हम ऐसे असत्याग्रही हो गये हैं कि सरकार के जुल्म के सामने झुककर नंगे होकर नाचने से भी ज्यादा नीच काम करते हैं । - - - - - -

- - - - - - - बेचारी सरकार भी नही कहती कि 'तुम्हें ऐसा करना ही पडेगा ।' वह कहती है कि 'तुम ऐसा नहीं करोगे तो तुम्हें सजा होगी।' हम अपनी अधम दशा के कारण मान लेते हें कि हमें 'ऐसा ही करना चाहिऐ', यह हमारा फर्ज है, यह हमारा धर्म है ।

अगर लोग एक बार सीख लें कि जो कानून हमें अन्यायी मालूम हो उसे मानना नामर्दगी है, तो हमें किसीका भी जुल्म बांध नहीं सकता । यही स्वराज्य की कुंजी हें ।

'हिंद स्वराज्य' मधून

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.-०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**